तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in

जा क्र. तंशिविकापु/विवि/पदविका प्रवेश/२०११-१२/५८०२ दिनांक :- १४/०७/२०११

14 JUL 2011

**अधिसूचना :-**

संदर्भ :- शासन निर्णय क्र.डीटीईअ/२०११/(८२/११) तांशि-५/दिनांक ११/०५/२०११.

**उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन असे कळविण्यांत येते की, सोबतच्या यादीमधील विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी / पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था शैक्षणिक वर्ष २०११-१२ करीता केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होणार नाहीत. ज्या संस्था केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होणार नाहीत त्या संस्थेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना फी प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळणार नाही . याची सदर संस्थेमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या सर्व विद्यार्थी व पालकांनी कृपया नोंद घ्यावी.**

(डि.एन. शिंगाडे )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत :- केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी न होणा-या संस्थांची यादी.

**शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी न होणा-या संस्थांची यादी**
**अभियांत्रिकी पदविका**

| | | |
|---|---|---|
| १ | 6415 | ऑल इंडिया श्री. शिवाजी मेमोरिएल सोसायटी, तंत्रनिकेतन, केनेडी रोड, आरटीओ जवळ, पुणे ४११ ००१. **(प्रथम शिफ्ट/द्वितीय शिफ्ट)** |
| २ | 6416 | डी वाय. पाटील तंत्रनिकेतन, सेक्टर नं २९, निगडी प्राधिकरणख आकुर्डी, पुणे ४११ ०४४. |
| ३ | 6405 | शिवगनर विद्याप्रसारक मंडळ, इंन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड इंजिनिअरींग, माळेगांव बुाा, ता. बारामती, जि पुणे ४११ ११५ |
| ४ | 6526 | श्री. सावित्रीबाई फुले पॉलिटेक्निक, पुणे सर्व्हे नं १२४ एमआयटी कॅम्पस्, पौड रोड, पुणे ४११ ०३८ |
| ५ | 6423 | जैन विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन, चिंचवडगांव, पुणे ४११ ०३३ |
| ६ | ६७१९ | जहांगीर हॉस्पिटल, जहांगीर इंस्टिट्यूट ऑफ पॅरामेडीकल स्टडीज, जहांगीर हॉस्पिटल कॅम्पस्, पुणे ४११ ००१. |
| ७ | ६७२२ | श्री.सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, सोमेश्वर तंत्रनिकेतन कॉलेज, सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे. |
| ८ | ६४२१ | डॉ. डि. वाय पाटील प्रतिष्ठानचे डॉ. डी वाय. पाटील तंत्रनिकेतन, कसबा बावडा, कोल्हापूर **प्रथम शिफ्ट** |

**शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी न होणा-या संस्थांची यादी**
**औषधनिर्माणशास्त्र पदविका**

| | | |
|---|---|---|
| ०१ | **6377** | शिवनगर विद्याप्रसारक मंडळ, इंन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, माळेगांव, बुाा, ता. बारामती, जि. पुणे ४११ ११५. |
| ०२ | **6499** | श्री. जैन विद्या प्रसारक मंडळाचे, श्री. फत्तेचंद जैन कॉलेज ऑफ फार्मसी, टेल्कोरोड, डी-२ ६०/६१ चिंचवडस्टेशन, पुणे ४११ ०१९. |
| ०३ | **6523** | एम. सी . ई. सोसायटीचे, इंन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, २३९०, एच. बी. हिदायतुल्ला रोड, आझम कॅम्पस् कॅम्प, पुणे ४११ ००१. |
| ४ | **6510** | श्रीराम शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ फार्मसी, पानीव, ता. माळशिरस, जि सोलापूर |
| ५ | **6399** | अकलूज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ फार्मसी, अकलूज, ता माळशिरस, जि. सोलापूर |

**शासकीय व अशासकीय अनुदनित/ विना-अनुदानित संस्थांमधील वर्ष २०११-१२ करिता एस.एस.सी व एच.एस.सी.नंतरच्या अभ्यासक्रमाच्या अभियात्रिकी/ तंत्रज्ञान औषधनिमाणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम प्रवेश अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश नियम**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र.डिटीईअ-२०११/(८२/११)/ताशि-५,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३.**
**दिनांक ११ मे, २०११.**

**शासन निर्णय :-** संचालक, तंत्रशिक्षण सचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या दि.२४ मार्च, २०११ च्या पत्रान्वये प्रथम वर्ष अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०११-१२ साठीच्या प्रवेश नियमास शासनाची मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

२. सदर प्रस्तावामध्ये संचालक, तंत्रशिक्षण सचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रवेश नियमावलीमध्ये ज्या सुधारणा सुचविलेल्या आहेत. त्यामध्ये केंद्रिय प्रवेश प्रक्रिया ( CAP ) सक्तीची ठेवण्यात आलेली होती. त्याऐवजी ऐच्छिक स्वरुपाची ठेवण्यास शासनाची मान्यता असून फी प्रतिपूर्ती योजना पुढे चालू राहिल्यास ज्या संस्था केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये (CAP) सहभागी होणार नाही त्यांना फी प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळणार नाही. या सुधारणासह प्रथम वर्ष अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.**

अंबादे
११/५/२०११

**( ज.म.अंबादे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. निवड नस्ती , तांशि-५.



(५५)